Date: / /

# Topic (1) संस्कृती (Culture)

## A) Culture : Meaning And Characteristics
## संस्कृती : अर्थ आणि वैशिष्ट्ये.

प्रस्तावना :-

मानव प्राणी हा सर्व सामाजिक शास्त्रांचा मुख्य अभ्यास विषय आहे. संस्कृती हे केवळ मानवी समाजाचेच वैशिष्ट्य आहे. मानव समाज आणि संस्कृती यांचा परस्परसंबंध आहे. संस्कृतीशिवाय मानवी समाजाची कल्पनाच करता येणार नाही. त्यामुळेच संस्कृतीला मानवी समाजाचा अविभाज्य घटक म्हणून ओळखले जाते. संस्कृती प्रत्येक समाजाची मध्यवर्ती संकल्पना आहे. संस्कृतीचे हे महत्त्व लक्षात घेऊनच समाजशास्त्रातील ती एक मूलभूत संकल्पना म्हणून अभ्यासली जाते.

मानवप्राणी आपले अस्तित्व टिकवण्यासाठी प्राचीन काळापासून सभोवतालच्या पर्यावरणाशी समायोजन साधत आला आहे. निसर्गातील इतर प्राण्यांमध्ये प्रमाणे मानव प्राणी निसर्गाला संपूर्ण शरण न जाता निसर्गावर आपला अंकुश ठेवत आला आहे. मानव प्राणी तसेच मानवी समाज कायम-स्वरूपी स्थिर असत नाहीत तर तो सतत परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करतो. या प्रक्रियेमधूनच मानवाने आपले जीवन समृद्ध केले.

मानवाने जीवनविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी उपकरणे तंत्रज्ञान अवजारे शास्त्रीय माहिती एकत्र केलेली आहे. प्राचीन काळापासून चालत आलेल्या अन्न संकलन शिकार व मासेमारी शेती व पशुपालन या आर्थिक क्रियांच्या प्रगतीबरोबरच एकाच ठिकाणी राहण्यासाठी घरांची निर्मिती केली आहे. मानवी समूहाच्या एकत्र जीवन जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या लोकरूढी, लोकनीती, परंपरा, धर्म, कायदा, सामाजिक मूल्ये यासारख्या सामाजिक नियमनांची निर्मिती केली आहे. अशा नियमनांच्या साहाय्याने अनेक सामाजिक संस्थांची निर्मिती केली आहे.

जीवनासाठी उपयुक्त अशा अनेक भौतिक व अभौतिक (मूर्त व अमूर्त) अशा अनेक बाबी, घटक जतन करून ठेवल्या आहेत हे घटक एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित केले जात आहेत. हे हस्तांतर सुलभ होण्यासाठी भाषेची निर्मिती झाली आहे. यामुळे सांकेतिक निवेदनाची व्यवस्था निर्माण झाली आहे. आपल्या अनुभवांना वारसा

Scanned with CamScanner

एका पिढीमधून दुसऱ्या पिढीकडे निरंतर चालू राहिला आहे. समाजामध्ये जन्मास येणाऱ्या प्रत्येक पिढीला अगोदरच्या पिढ्यांनी संग्रहित केलेल्या वस्तूंचा, ज्ञानाचा, भौतिक-अभौतिक कल्पनांचा उपयोग होऊ लागला अशा प्रकारचा कोणत्याही समाजात दिसून येणारा वारसा म्हणजे त्या समाजाची संस्कृती होय. संस्कृती हा शब्द दैनंदिन व्यवहारामध्ये अनेक अर्थाने वापरला जातो मात्र त्याचा समाजशास्त्रीय अर्थ पुढीलप्रमाणे

व्याख्या :- Definition :-

1) एडवर्ड टायलर :-

"संस्कृती म्हणजे अशी संकीर्ण व्यवस्था आहे की ज्यामध्ये ज्ञान, श्रद्धा, कला, कायदे, परंपरा, नीतीतत्वे इ. व अशाच काही क्षमता सवयींचा समावेश होतो आणि व्यक्तीने समाजाचा सदस्य या नात्याने त्या संपादित केलेल्या असतात."

2) इरावती कर्वे :-

"मानवी समाजाची डोळ्यांना दिसणारी भौतिक वस्तूरूप निर्मिती व डोळ्यांना न दिसणारी परंतु विचारांना आकलन होणारी सृष्टी म्हणजे संस्कृती होय."

संस्कारपूर्ण व संस्कारमय जीवन जगण्याची देशकालीन विशिष्ट रीत म्हणजे संस्कृती होय.

3) हस्को व्हिटस :-

संस्कृती हा पर्यावरणाचा मानवनिर्मित भाग आहे.

4) मॅलिनोव्हस्की :-

"ज्यांच्याद्वारे मानव आपली उद्दिष्ट्ये साध्य करतो मानवनिर्मित साधने व माध्यमे म्हणजेच संस्कृती होय."

व्यक्ती समाजाचा सदस्य या नात्याने ज्ञान, कला, नीतीतत्वे ग्रहण करतो या सर्वांची जटील व्यवस्था म्हणजे संस्कृती होय. संस्कृती मानवनिर्मित असून ती व्यक्तीला शिकावी लागते. त्यामुळेच संस्कृती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत असते. या संस्कृतीची

Scanned with CamScanner

Date: / /

## संस्कृतीची वैशिष्ट्ये :-
## Characteristics of Culture :-

१) संस्कृती ही मानवनिर्मित आहे:-

निसर्ग किंवा निसर्गातील विविध गोष्टी या मानवनिर्मित नाहीत. उदा. सूर्य, आकाश, चंद्र इ. या सर्व गोष्टी निसर्गाची देण आहेत. मात्र मानवाने आपल्या बुद्धिमत्तेचा वापर करून त्यातून अनेक गोष्टी निर्माण केलेल्या आहेत. उदा. मातीपासून विटा, विटांपासून घराची निर्मिती, दगडातून शिल्पकला, सोन्यापासून दागिने इ.

समाजातील सामाजिक मूल्ये, विश्वास, प्रमाणके, प्रतिके, भाषा परंपरा या सर्व गोष्टी अभौतिक असल्या तरी त्या मानवनिर्मित आहेत. आपले जीवन सुखी करण्याच्या दृष्टीने मानवाने सामाजिक व्यवहारासाठी अनेक भौतिक, अभौतिक गोष्टींची निर्मिती केलेली आहे. या सर्व गोष्टींचा समावेश संस्कृतीमध्ये केला जातो. त्यामुळे संस्कृतीला मानवनिर्मित म्हणून ओळखले जाते.

२) संस्कृती अमूर्त असते :-

संस्कृतीमध्ये विश्वास, परंपरा, ज्ञान, कायदा, चिन्हे इ. घटकांचा समावेश होतो. हे सर्व घटक अदृश्य आणि अस्पर्श आहेत म्हणजेच या गोष्टी दिसत नाहीत किंवा दाखविता येत नाहीत. त्यांना स्पर्शदेखील करता येत नाहीत. परंतु या गोष्टी जाणून घेता येतात म्हणजेच हे सर्व घटक अमूर्त, व अभौतिक आहेत. संस्कृतीमध्ये मूर्त किंवा भौतिक वस्तूंचा समावेश होत असला तरी अमूर्त, अभौतिक गोष्टींनाच प्राधान्य दिले जाते. एडवर्ड टायलर, हॅरी जॉन्सन या विचारवंताच्या मते, संस्कृती ही अमूर्त किंवा अभौतिक असते.

३) संस्कृतीचे हस्तांतरण होत असते :-

समाजामध्ये प्रत्येक व्यक्तीला संस्कृती शिकावी लागते. शिकण्याच्या प्रक्रियेमुळे संस्कृती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत असते. भाषा आणि

Scanned with CamScanner

संकेत या माध्यमातून संस्कृतीचे हस्तांतरण होत असल्याने संस्कृती टिकून राहिलेली आहे. अन्यथा जुनी पिढी नष्ट झाल्यानंतर त्या पिढीची संस्कृती देखील त्यांच्याबरोबर नष्ट झाली असती मात्र समाजातील श्रध्दा, ज्ञान, परंपरा, सा. मूल्ये, नीतीनियम इ. गोष्टी एका पिढीकडून दुसरी पिढी शिकत असते. त्यामुळे संस्कृतीचे हस्तांतरण किंवा संक्रमण घडून येते.

४) संस्कृती संचयशील आहे :-

संस्कृतीचे संक्रमण किंवा हस्तांतरण होत असल्यामुळे संस्कृती कायमस्वरुपी टिकून असते. परंतु त्याचबरोबर संस्कृतीमध्ये नवनवीन ज्ञान, माहिती इ.ची भर पडत असते. त्यामुळे संस्कृतीचा निरंतर विकास घडून येतो. मानव आपल्या बुध्दीचा उपयोग करुन सतत नवीन ज्ञान प्राप्त करतो. जुन्या ज्ञानाबरोबरच नवीन ज्ञानाचाही संस्कृतीमध्ये संचय, साठा केला जातो. आवश्यकतेनुसार या नवीन घटकांचे परीक्षण करुन त्यामध्ये बदल केला जातो. संस्कृतीमध्ये जुन्या गोष्टींबरोबरच नवनवीन गोष्टींचा समावेश, संचय होत असल्यामुळे संस्कृतीचे स्वरुप संचयशील आहे.

५) संस्कृती परिवर्तनशील आहे :-

कोणत्याही समाजातील संस्कृती कायमस्वरुपी एकसारखी स्थिर असत नाही. बदलत्या परिस्थितीनुसार काळाच्या प्रवाहाबरोबर संस्कृतीमध्येही परिवर्तन होत असते मानवाला नवीन माहिती, ज्ञान प्राप्त झाल्यानंतर त्या माहितीच्या सहाय्याने त्या संस्कृतीमध्ये नवीन गोष्टींची भर टाकून परिवर्तन घडवून आणले जाते. काहीवेळा बदलत्या परिस्थितीनुसार मानव समाजात निर्माण होणाऱ्या समस्या सोडवण्याच्या दृष्टीने जुन्या संस्कृतीमध्ये बदल केले जातात. त्याचप्रमाणे संस्कृतीचे हस्तांतरण होत असताना नव्या पिढीकडून सर्व गोष्टी आहे तशा स्विकारल्या जात नाहीत त्यामध्ये परिवर्तन होत असते. संस्कृती परिवर्तनशील असली तरी त्यात सहज - बदल किंवा परिवर्तन होत नाही त्यासाठी कालावधी लागतो.

Scanned with CamScanner

6) सामूहिक मालकी :-

एखादया वस्तूवर एखादया व्यक्तीची मालकी असू शकते. संस्कृतीवर मात्र कोणत्याही एका व्यक्तीचा मालकी हक्क असत नाही. कारण संस्कृती संपूर्ण समाजाची असते. एका व्यक्तीने संस्कृतीची निर्मिती केलेली नाही अनेक व्यक्तींच्या परस्परसंबंधामधूनच संस्कृतीची निर्मिती झालेली आहे. संस्कृतीमधील परंपरा, विश्वास, ज्ञान यांसारख्या घटकांवरती व्यक्तीची मालकी नाही. तर संस्कृती ही संपूर्ण समाजाची असते.

7) संस्कृतीचे स्वतंत्र अस्तित्व आहे :-

संस्कृती ही मानवनिर्मित आहे हे जरी सत्य असले तरी या संस्कृतीची निर्मित करणारा मानव प्राणी नेहमी असत नसतो. प्रत्येक व्यक्तीचा शेवट हा होतच असतो. मात्र त्यामुळे संस्कृती नष्ट होत नाही. संस्कृतीचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरण होते कारण संस्कृतीला स्वतंत्र अस्तित्व ~~कूर्त~~ प्राप्त आलेले आहे. संस्कृती संचयशील असते. संस्कृती परिवर्तनशील आहे. त्याचप्रमाणे तिला स्थिर व स्वतंत्र अस्तित्व प्राप्त झालेली आहे.

8) संस्कृती ही समूहांसाठी आदर्श असते :-

समूहातील व्यक्तीचे वर्तन हे संस्कृतीनुसार असले पाहिजे. अशी समाजाची अपेक्षा असते. कारण संस्कृतीमधील विश्वास, प्रथा, परंपरा, संकेत त्या व्यक्तीसाठी आदर्श असतात. समाजातील संस्कृतीप्रमाणे व्यक्तीचे आचरण असले पाहिजे. यासाठी काही नियम निर्माण केले. सदस्यांना लहानपणापासून योग्य वेळी योग्य शिक्षण दिले जाते. आपली संस्कृती आपल्यासाठी आदर्श आहे. यावरती त्या समाजाचा विश्वास असतो. प्रत्येक समूहासाठी आपली संस्कृती आदर्श असते.

9) संस्कृती ही मानवी गरजांची पूर्तता करते :-

मानवाच्या अनेक गरजा आहेत. व्यक्ती आपल्या सर्व गरजांची पूर्तता स्वत: करू शकत नाही. इतर व्यक्तींच्या समाजाच्या माध्यमातून पूर्ण केल्या जातात. गरजांची पूर्तता कोणत्या मार्गाने करावी यासाठी संस्कृतीकडून मार्गदर्शन केले जाते. मानवी समाजाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ~~अ~~समाजाची निर्मिती झाली आहे.

Scanned with CamScanner

वाढल्यास समाजामधील घटकांत बदल होत असतो. समाजाच्या गरजांची पूर्तता करण्याची क्षमता संस्कृतीमध्ये असते.

१०) संस्कृती ही प्रतिकात्मक आहे :-

केवळ भौतिक वस्तू म्हणजेच संस्कृती असा अर्थ अभिप्रेत नाही. त्या भौतिक वस्तूंना जो प्रतिकात्मक अर्थ दिला जातो. त्यामुळे त्या वस्तू संस्कृती सांस्कृतिक ठरत असतात. संस्कृतीमध्ये प्रामुख्याने अभौतिक घटकांचा समावेश अधिक प्रमाणात असतो. संस्कृती ही प्रत्यक्ष दाखवता येत नाही. मात्र प्रतिकांच्या माध्यमातून संस्कृतीचा अर्थ लक्षात येतो. उदा. अशोक चक्र हे बौद्ध धर्माचे प्रतिक आहे. ॐ हे हिंदू धर्माचे प्रतिक आहे. म्हणूनच संस्कृती प्रतिकात्मक स्वरूप असते.

११) प्रत्येक समाजाची संस्कृती वेगळी असते :-

प्रत्येक समाजात संस्कृती अस्तित्वात असली तरी सर्व समाजाची संस्कृती एकसारखी नाही. भौगोलिक भिन्नता व सामाजिक परिस्थितीनुसार प्रत्येक समाजाची संस्कृती वेगळी ठरत असते. त्या समाजातील मूल्ये, प्रमाणके परस्परांमध्ये फरक दिसून येतो. उदा. भारतीय संस्कृती व अमेरिकन संस्कृती यामध्ये फरक आहे.

वरीलप्रमाणे मानवी समाजात अस्तित्वात असणारा संस्कृती या संकल्पनेची वैशिष्ट्ये स्पष्ट केली जातात.

Scanned with CamScanner

B) संस्कृतीचे घटक :- [Components of culture]

संस्कृती ही संकल्पना अधिक स्पष्ट करण्याच्या दृष्टीने संस्कृतीमध्ये कोणकोणत्या घटकाचा समावेश केला जातो. याचा विचार करणे गरजेचेच आहे संस्कृतीमध्ये मानवनिर्मित सर्व भौतिक व अभौतिक, मूर्त व अमूर्त या घटकांचा समावेश होत असतो. मात्र काही अभ्यासकांनी संस्कृतीमध्ये अभौतिक-अमूर्त घटकांना अधिक महत्त्व दिले आहे. संस्कृतीचे मुख्य घटक पुढीलप्रमाणे :-

A] हॅरी जॉन्सन यांचे विचार :-

प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ हॅरी जॉन्सन यांनी मानवी समाजातील संस्कृतीमध्ये प्रमुख चार घटक असतात हे स्पष्ट केले ते घटक पुढीलप्रमाणे

संस्कृतीचे घटक
↓
ज्ञान | विश्वास | मूल्ये व प्रमाणके | चिन्हे

1) ज्ञान :- [Knowledge] :- संस्कृतीचा ज्ञान हा घटक आहे. सर्वच मानवी समाजामधील संस्कृतीमध्ये भौतिक आणि सामाजिक विश्वासंबंधी ज्ञानाचा समावेश झालेला असतो. हे ज्ञान मानवाला त्याच्या अस्तित्वासाठी माहीत असणे आवश्यक आहे. हेच ज्ञान किंवा माहिती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत असते.

मनुष्य आपल्या गरजा पूर्ण करत असताना भौतिक विश्वासंबंधीच्या अनेक घटकांचे ज्ञान प्राप्त करत आला आहे. या ज्ञानामध्ये पर्यावरण हवामान, पर्वत, पशुपक्षी, आकाश, चंद्र, सूर्य यांसारख्या निसर्गातील अनेक गोष्टींचा समावेश होतो, तर सामाजिक विश्वासंबंधीच्या ज्ञानामध्ये आचार-विचार, रुढी-परंपरा, विश्वास सामाजिक संस्था या प्रकारच्या ज्ञानाचा समावेश होतो. दोन्ही प्रकारचे ज्ञान प्राप्त करण्याची प्रक्रिया ही प्रत्येक समाजात निरंतर सुरु असते. अप्रगत समाजाप्रमाणेच प्रगत समाजातही विविध प्रकारचे ज्ञान व्यक्ती प्राप्त करत असते. या भौतिक आणि सामाजिक विश्वासंबंधी असणाऱ्या ज्ञानाचा अंतर्भाव संस्कृतीमध्ये होतो. यासाठी ज्ञान हा संस्कृतीचा महत्वाचा घटक आहे.

Scanned with CamScanner

2) विश्वास :-

समाजामध्ये मानवाला सर्व गोष्टी घटना याविषयीची माहिती ज्ञानामधूनच मिळते असे नाही. अनुभवातून देखील प्राप्त होत नाही. अशा गोष्टींबद्दल समाजात काही श्रद्धा, विश्वास, कल्पना असतात. संस्कृतीमध्ये अशा अनेक प्रकारच्या श्रद्धांचा समावेश होतो.

ईश्वराचे अस्तित्व मानव प्राचीन काळापासून मान्य करत आला आहे. त्यामुळे ईश्वराशी संबंधित स्वर्ग, नर्क, शुभ, अशुभ, पुनर्जन्म यावरती लोकांची श्रद्धा आहे., विश्वास आहे. संस्कृतीतील अशा असणाऱ्या श्रद्धा, विश्वास, सत्य असतीलच असे नाही ते मानवी बुद्धीच्या कसोटीवर पटतील असे नाही तरी सुद्धा अनेक प्रकारचे विश्वास, श्रद्धा, संस्कृती मध्ये दिसून येतात. संस्कृतीमधील श्रद्धांचा लोकांवरती प्रभाव असतो. लोक त्यांना सत्य समजून आचरण करतात. ज्या व्यक्ती अशा श्रद्धा मानत नाहीत त्यांचे वर्तन संस्कृती विरोधी मानले जाते. यासाठीच श्रद्धा किंवा विश्वास या घटकांना संस्कृतीमध्ये विशेष महत्त्व दिले जाते.

3) मूल्ये व प्रमाणके :-

सामाजिक मूल्ये व प्रमाणके हा संस्कृतीचा तिसरा घटक आहे. सर्वच समाजाच्या संस्कृतीमध्ये सामाजिक मूल्ये व प्रमाणके दिसून येतात. समाजाने स्वीकारलेल्या सामाजिक मूल्यांवरती प्रमाणके आधारित असतात त्यामुळे मूल्यांमध्ये बदल झाल्यास प्रमाणकांमध्येही बदल होतो.

योग्य आणि अयोग्य याविषयी असणाऱ्या अमूर्त कल्पना म्हणजे सामाजिक मूल्य होय. म्हणजेच ज्याच्या आधारे योग्य किंवा अयोग्य निर्णय घेतले जातात. असे मापदंड म्हणजे सामाजिक मूल्य आहे.
उदा. समता, मानवता इ.

सामाजिक मूल्यांच्या आधारे सामाजिक नियमांची व्यव[स्था] उदयास येते. समाजातील सदस्यांच्या वर्तनास नियंत्रित करणा[ऱ्या] नियमांना प्रमाणके म्हणून ओळखले जाते. समाजीकरणाच्या प्रक्रि[ये] मधूनच व्यक्ती प्रमाणके आत्मसात करते ही प्रमाणके लिखित किं[वा] अलिखित औपचारिक, अनौपचारिक असतात. रुढी, कायदे, लोकनी[ती] ही प्रमाणकांची उदाहरणे आहेत. सामाजिक मूल्ये व प्रमाणके संस्कृ[ती]

Scanned with CamScanner

घटक असून त्यानुसार व्यक्तीचे वर्तन नियंत्रित केले जाते. सामाजिक मूल्ये आणि प्रमाणकानुसार व्यक्तीने आचरण असावे अशी सामाजिक अपेक्षा असते.

४) चिन्हे :-

एखादया संस्कृतीची जाणीव होण्यासाठी किंवा काही विचारसूचित करण्यासाठी त्या संस्कृतीमध्ये काही चिन्हांचा, प्रतिकांचा वापर केला जातो. विभिन्न संस्कृतीमध्ये प्रतिकांच्या स्वरूपात बदल दिसून येतो मात्र प्रतिकांशिवाय संस्कृती दिसून येत नाही. चिन्हांच्या प्रतिकांच्या माध्यमातून विशिष्ट वस्तूंचा घटनांचा निर्देश होत असतो. भाषा ही प्रतिकांची व्यवस्था आहे. विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी भाषा हे प्रतिक मानले जाते. प्रत्येक प्रतिकाला विशिष्ट अर्थ असतो. उदा. राष्ट्रध्वज, अलंकार चिन्हे इ. सामाजिक संबंधांमध्ये सातत्य आणि स्थिरता प्रतिकांमुळेच निर्माण होतो. चिन्हे, प्रतिके याबरोबरच संस्कृतीमध्ये काही संकेत असतात त्या संकेताचा अर्थ विशिष्ट परिस्थितीच्या संदर्भात जाणून घ्यावा लागतो. उदा. विविध प्रकारची घंटा वाजल्यामुळे त्याच्यातून अनेक संकेत सूचित होतात. शाळा सुटल्याचा, आग लागण्याचा, शर्यत सुरु होताना इ. संस्कृतीमध्ये चिन्हांना विशेष महत्त्व आहे. चिन्हांमध्ये संकेत आणि ~~शर्यत~~ प्रतिके यांचा समावेश केला आहे.

वरीलप्रमाणे हॅरी जॉन्सन यांनी ज्ञान, विश्वास, मूल्ये व प्रमाणक चिन्हे हे संस्कृतीमधील चार घटक स्पष्ट केलेले आहेत. हे सर्व घटक परस्पर परस्परसंबंधित असून या घटकांची व्यवस्था म्हणजेच समाजव्यवस्था होय

B) भौतिक आणि अभौतिक संस्कृती (मूर्त किंवा अमूर्त संकल्पना)

मानवी समाजाच्या समग्र जीवन पद्धतीलाच संस्कृती असे म्हटले जाते. या संस्कृतीमध्ये समाविष्ट होणाऱ्या वस्तू घटना कोणत्या स्वरूपाचे आहेत. यावरून संस्कृतीचे मूलभूत दोन घटक प्रकार पाडले जातात ते पुढीलप्रमाणे :-

१) भौतिक आणि मूर्त संस्कृती :-

ज्या वस्तू आपण बघू शकतो ज्या वस्तूंना स्पर्श करू शकतो अशा सर्व मानवनिर्मित वस्तूंचा समावेश भौतिक किंवा मूर्त संस्कृतीमध्ये होत असतो. मानवाने आपल्या गरजांची पूर्तता करण्या साठी भौतिक वस्तूंची निर्मिती केली आहे. उदा. घर, यंत्र, संगणक,

फर्निचर, दागदागिने, कपडे इ.
आपल्या बुद्धीचा उपयोग करून निसर्गाशी समायोजन साधण्यासाठी मानवाने भौतिक संस्कृतीचा विकास केला आहे. याच भौतिक संस्कृतीनं मानवाला सर्वश्रेष्ठ प्राणी असा दर्जा प्राप्त करून दिला आहे

2) अभौतिक किंवा अमूर्त संस्कृती :-
अभौतिक गोष्टी या अदृश्य, अस्पर्श आणि अमूर्त असतात. डोळ्यांना न दिसणाऱ्या तरी मानवी मनाला जाणवणाऱ्या गोष्टींचा समावेश अभौतिक, अमूर्त संस्कृतीमध्ये केला जातो. अभौतिक गोष्टी मानवाच्या जीवनावर मानवाच्या मनावर मोठा प्रभाव पाडतात. प्रत्येक संस्कृतीमध्ये ज्ञान, विश्वास, मूल्ये व प्रमाणके, परंपरा इ. अमूर्त व अभौतिक गोष्टी असतात. या गोष्टी आपणाला प्रत्यक्ष दाखवता येत नाहीत. परंतु व्यक्ती आपले सामाजिक जीवन याच अभौतिक गोष्टींनुसार जगत असतो.